# मिरा-भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसपंर्क विभाग
# प्रेसनोट

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुरु असलेल्या विकास कामांच्या स्थळ पहाणी दरम्यान मिरागाव येथील अमर पॅलेस जवळील कॉक्रीट रस्ता, मिरारोड (पूर्व) पूनम गार्डन मधील कॉक्रीट रस्ता तसेच मिरारोड (पूर्व) जांगीड ते प्लीझंट पार्क पर्यंत कॉक्रीट रस्ता तयार करणे. कामाच्या ठिकाणी कॉक्रीटचा काही भाग खराब झाल्याचे आढळून आले. तसेच काही ठिकाणी कामाची लाईन लेव्हल कामाचा दर्जा व्यवस्थित दाखल केला नसल्याने कंत्राटदार व महानगरपालिकेचे संबंधित अभियंता यांना नोटीसा बजावून खुलासा घेण्यात आला सदर खुलासा समाधानकारक नसल्याने कंत्राटदार यांना कामाचा दर्जा व्यवस्थित नसल्या ठिकाणी केलेले कॉक्रीट काढून घेऊन नव्याने कॉक्रीट पॅनल करण्याचे बजावण्यात आले. त्यानुसार कंत्राटदारामार्फत कॉक्रीट काढून घेऊन पुनश्च सदर काम करुन देण्याची प्रकिया सुरु करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विकास कामात सुरक्षेच्या उपाययोजना न करणाऱ्या कामात दिरंगाई करणाऱ्या कामास विलंब करणाऱ्या तसेच कामाचा दर्जा व्यवस्थित राखत नसलेल्या कंत्राटदारावर या पुढे दंडात्मक तसेच कडक कारवाई केली जाणार असून महानगरपालिकेच्या अभियंत्यावर देखील कारवाई करुन काम समाधानकारक असल्याशिवाय कोणतेही कंत्राटदाराचे देयक प्रदान केले जाणार नाही असे श्री. संजय काटकर, आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी स्पष्ट केले.

शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका